# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** कागल
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0217 **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**21/05/2024 23:36

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** मंगलवार
      **Time Period (कालावधी):**
      **Date From (दिनांक पासून):** 21/05/2024
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 21/05/2024
      **Time From (वेळेपासून):** 12:43 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 16:03 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 21/05/2024 **Time (वेळ):** 23:22 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 041
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/05/2024 23:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** तहसिलदार कार्यालय कागल,तहसिलदार कार्यालय कागल

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** कागल
   **District(State) (जिल्हा(राज्य)):** कोल्हापुर(महाराष्ट्र)

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): फाजल गुलाब संभापूरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1967

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 2313,सी वार्ड, अकबर मोहल्ला,सोमवार पेठ, कोल्हापूर,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | 2313,सी वार्ड, अकबर मोहल्ला,सोमवार पेठ, कोल्हापूर,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती अश्विनी अतुल कारंडे | | | 1. लक्षदीप नगर, 4 नंबर बंगला, प्लट नंबर 339, रेल्वे स्टेशन , समोर न्यु शाहुपूरी कोल्हापूर, समोर न्यु शाहुपूरी कोल्हापूर, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक - 21/05/2024

मी फाजल गुलाब संभापूरे, वय - 57 वर्षे, व्यवसाय- व्यापार, रा. 2313,सी वार्ड, अकबर मोहल्ला, सोमवार पेठ, कोल्हापूर मो.नं.9146858727. समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 20/05/2024 रोजी अॅन्टी करप्शन कार्यालय कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री. सरदार नाळे यांचे कार्यालयात येवुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, माझा गौण खनिज विक्रीचा व्यवसाय असुन मी संगीता बाळासो पाटील, रा.गलगले, ता.कागल,यांच्याकडुन त्यांची मौजे गलगले येथील गट क्रमांक 268/ब मधील 14.61 गुंठे जमीन ही वाणिज्य वापराकरीता भाडे करारावर घेणार आहे. सदरची जमीन ही एन.ए.करणे आहे त्याकरीता जमीन मालक संगीता पाटील यांच्यावतीने मी तहसील कार्यालय कागल येथे वर नमुद गटातील जमीन एन.ए.होणेबाबतचा अर्ज तहसील कार्यालय कागल येथे दिनांक 08/01/2024 रोजी अर्ज केला होता. सदर जमीनचे एन ए. अर्जाबाबतचे काम कागल तहसील कार्यालयातील कारंडे मॅडम हया पाहत असलेने मी त्यांना मागील एप्रिल महिन्यात भेटलो असता कारंडे मॅडम यांनी मला जमीन एन.ए.करून देणेसाठी 80,000/- रूपये दयावे लागतील तरच एन.ए.चे काम होईल असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना पैशाची जुळणा करून भेटतो असे सांगुन तेथुन निघुन आलो होतो. परंतु कारंडे मॅडम मागत असलेली लाच रक्कम त्यांना देणेची मला इच्छा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी. मी दिनांक 21/05/2024 रोजी कारंडे मॅडम यांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगितले. यावेळी नाळे साहेबांनी त्यांचे ऑफिसकडील पोलीस निरीक्षक श्रीमती आसमा मुल्ला यांना बोलावुन घेवुन माझे तक्रारीवर कारवाई करणेबाबत सांगितले. त्यानंतर मी मुल्ला मॅडम यांना माझी तक्रार सांगुन त्यांचेकडे तक्रारी अर्ज दिला. त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी मला दिनांक 21/05/2024 रोजी सकाळी 10.30 वा ऑफीसमध्ये येण्यास सांगितले. मी दिनांक 21/05/2024 रोजी कार्यालयात आलेनंतर मुल्ला मॅडम यांनी मला बोलावुन घेवुन दोन पंच व स्टाफ सोबत ओळख करून दिली. त्यावेळी मी त्यांना वरील तक्रार सांगितली. त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी पुढील कार्यवाही ही कागल येथील जयसिंगराव घाटगे तलाव परीसरातुन करणेची आहे असे सांगुन आपण लागलीच सदर ठिकाणी जायचे असे सांगितले त्यानंतर आम्ही सर्वजण निघुन जयसिंगराव घाटगे तलाव कागल येथे आलो.

त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगितले. मुल्ला मॅडम यांनी यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हाला देवुन मला अव्वल कारकुन कारंडे यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना कारंडे मॅडम यांना भेटणेकरीता त्यांचे तहसील कार्यालय कागल येथे पाठविले. त्यावेळी मुल्ला मॅडम स्वतः, पंच नं.2 तसेच सापळापथक असे तलाव परीसरात थांबुन राहीले. मी व पंच नं.1 असे तहसील कार्यालय कागल येथे गलो त्यावेळी कार्यालयात गर्दी होती म्हणुन थांबलो होतो त्यानंतर मी कारंडे मॅडम यांना भेटलो असता त्यांनी मला त्या पंधरा मिनीटात जावुन येतो असे सांगुन निघुन गेल्या. त्यानंतर काहीवेळाने कारंडे मॅडम ऑफीसमध्ये आल्या त्यावेळी मी त्यांना भेटलो. त्यावेळी आमच्यात कामाबाबत बोलणे झाले त्यावेळी कारंडे मॅडम मला चलन करून घ्या असे म्हणाल्या त्यावेळी मी चलन कितीचे होईल असे विचारले त्यावेळी कारंडे मॅडम सांगते असे म्हणाल्या. त्यावेळी मी मॅडम मी आता एक तीस हजार देतो आणि फैय्याज येईल पाच ते सहा वाजता तोपर्यंत बाकीचे पेमेंट करतो मला ऑर्डर आणि चलन दया से म्हणालो. त्यावेळी कारंडे मॅडम संगळच असे म्हणाल्या त्यावेळी मी नाही नाही विषय आजच्या आज संपवतो ऑर्डर आणि चलन दया असे म्हणालो त्यावेळी कारंडे मॅडम ऑर्डर नाही चलन देतो असे म्हणाल्या. त्यावेळी मी आता तुम्हाला कॅश देतो तीस थाऊजड....कॅश आहे....कॅश डिगीत आहे गाडीच्या... असे म्हणालो. त्यावेळी कारंडे मॅडम आणा की मग... असे म्हणाल्या त्यावेळी मी ओके म्हणालो. त्यानंतर मी व पंच नं.01 तेथुन मुल्ला मॅडम थांबलेल्या ठिकाणी परत येवुन त्यांना वरील हकीकत सांगितली.

त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी सापळा कारवाई सुरू केली सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही

केलेनंतर 500/- रूपये दराच्या 40 चलनी नोटा असे 20,000/- रूपये व लहान मुलाच्या खेळण्यातील 500/- रूपये असे लिहलेल्या 20 डमी नोटा उपलब्ध केल्या. असे एकुण 30,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली वरील सर्व नोटाना अॅथ्रासिन पावडर लावले त्यानंतर वरील 30,000/- रूपये रक्कम माझे पॅन्टचे उजवे बाजुच्या खिशात ठेवुन रेकॉर्डर सुरू करून ते माझेकडे दिले त्यावेळी मी व पंच नं.1 असे माझे मोटरसायकलने निघालो. त्यावेळी माझे पाठोपाठ मुल्ला मॅडम, सापळा पथक पंच नं.2 आले व प्रशासकीय इमारत कागल परिसरात व तहसीलदार कार्यालय परिसरात सापळा लावुन थांबले आणि मी कारंडे मॅडम यांना त्यांचे टेंबलजवळ जावुन भेटलो. त्यावेळी कारंडे मॅडम मला तुम्ही येतो म्हणाला ते गायब झाला... असे म्हणाल्या त्यावेळी मी त्यांना फैयाज वेळान आला... असे म्हणालो त्यानंतर मी साठ हजार रूपये ते काय म्हणलास मी आता कागल मध्ये हाय ते आस हाय आणि तस हाय ते काय तरी थापा माराय लागलय... असुदे माझ्याकडे हाईते ते तीस हजार रूपये तेवढे घ्या... असे म्हणुन मी कारंडे मॅडम यांना तीस हजार रूपये दिले. त्यावेळी त्यानी ते पैसे घेवुन टेबलेच्या ड्रॉव्हर मध्ये ठेवले त्यानंतर माझ्या कामाचे अनुषंगाने बोलणे झाले त्यावेळी मॅडम यांनी मला फैयाज ला फोन लावुन कोठे आहेत बघा असे म्हणाल्या त्यावेळी मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर लगेच मुल्ला मॅडम आणि त्यांचा स्टाफ तेथे आला व त्यांनी लाच स्विकारलेल्या रक्कमेसह अव्वल कारकुन अश्विनी कारंडे यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही ही कागल पोलीस ठाणे येथे पुर्ण करण्यात आली.

तरी माझा गौण खनीज खरेदी विक्रीचा व्यवसाय आहे. त्याकरीता मी गलगले, ता. कागल येथील गट नंबर 268 ब मधील जमीन वाणीज्य वापराकरीता भाडे करारावर घेणार आहे. सदरची जमीन एन ए करणे आहे त्यासाठी मी जमीन मालकांचे वतीने सदरची जमीन एन ए होणेबाबत अर्ज तहसील कार्यालय कागल येथे केला होता सदर जमीनचे एन ए. अर्जाबाबत मी तहसील कार्यालयात कागल येथे जावुन कारंडे मॅडम यांना भेटलो त्यावेळी कारंडे मॅडम यांनी जमीन एन.ए.करणेकरीता माझेकडे अप्रामाणिकपणे 60,000/- रूपयांची मागणी करून लागलीच 30,000/- रूपये घेवुन येण्यास सांगितले त्याप्रमाणे मी 30,000/- रूपये घेवुन आलेनंतर माझ्याकडुन अव्वल कारकनु कारंडे मॅडम यांनी बेकायदेशीरपणे 30,0,00/- रूपये लाच स्विकारताना त्यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने त्यांना रंगेहाथ पकडल्याने माझी श्रीमती अश्विनी अतुल कारंडे, वय - 43 वर्षे, पद - अव्वल कारकुन, तहसीलदार कार्यालय कागल, ता. कागल, जि.कोल्हापूर वर्ग - 3, रा. लक्ष्दीप नगर, 4 नंबर बंगला, प्लॅट नंबर 339, रेल्वे स्टेशन समोर न्यु शाहुपूरी कोल्हापूर यांचेविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले)**:**

gajendra pralhad lohar(I (Inspector)) /

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव)**:** **or (किंवा)**

**Rank (पद):**

**No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
कागल पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** gajendra pralhad lol
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):